महाराष्ट्र शासन

क्रमांकः- एनजीसी-२००५/(४१५ /०५)/ मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांकः- ६ ऑगस्ट, २००५

प्रति,
कुलसचिव,
एस.एन.डी.टी. वि‍द्यापीठ,
मुंबई

विषयः- संभाजीराव शिंदे विद्यामंदिर, सोलापूर
अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत

संदर्भ:- १) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, भोपाळ यांचे क्र. WRC/२-३२/७४
२००५/५४९१, दि. ६ जुलै, २००५.
२) शासनाचे क्र. अमवि-२००४/(२७१/०४)/ मशि-३, दि. ६ ऑगस्ट, २००४

महोदय,

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद , भोपाळ यांनी त्यांच्या दि. ६ जुलै, २००५ च्या पत्रान्वये संभाजीराव शिंदे विद्यामंदिर, सोलापूर या संस्थेस सोलापूर येथे अध्यापक महाविद्यालय सन २००५-०६ या वर्षापासून काही अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे. सदर मान्यता लक्षात घेऊन उपरोक्त संस्थेस शासनाकडे भविष्यात अनुदानासाठी वा इतर आर्थिक बाबीसाठी मदत मागणार नाही अशा आशयाचे हमीपत्र एस.एन.डी.टी. विद्यापीठ मुंबई व सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचेकडे सादर करण्याच्या अटीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलमं ८२ (५) नुसार सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन अध्यापक (बी.एड.) महाविद्यालय एन. सी. टी. ई. भोपाळ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. संबंधित संस्थेस शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे काय, तसेच एन.सी.टी.ई. भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा विद्यापीठाने करणे आवश्यक राहील.

२. आपले लक्ष शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ६ ऑगस्ट , २००४ च्या पत्राकडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार वरील अटींबाबत खातरजमा केल्यानंतरच विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबतची आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करुन पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य , पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांना कृपया पाठवावा.

आपला,
(स्वाक्षरी)
( बि. वा. सुतार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे.
सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
खाजगी सचिव, मा. मंत्री (उच्च शिक्षण)
खाजगी सचिव , मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.)
अध्यक्ष, संभाजीराव शिंदे विद्यामंदिर,९१ मुरारजी पेठ, ओल्ड मिल कंपाऊंड, सोलापूर
निवड नस्ती - मशि-३

C:\MASHI-3\Orders\New B.E.d. College Permission\Pasenar Maharashtra & other's Sanstha-2005-06 formal orders.doc